## महाराष्ट्र शासन
## भरती जाहिरात

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बाल विकास प्रकल्प अधिकारी ( नागरी ) अकोला- वाशिम यांच्या अधिनस्त असलेल्या वाशिम,मंगरूळपीर ,मानोरा ,कारंजा लाड ,पातुर ,बार्शीटाकळी ,अकोट , व बाळापुर या शहरी भागातील अंगणवाडी केंद्रातील रिक्त असलेल्या अंगणवाडी मदतनीस मानधनी या पदाकरिता स्थानिक महिला उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

जाहिरात क्रमांक -०१ बाविप्रअ/नागरी/वाशिम/2023-24/184 दिनांक :- 15/06/2023

अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक :- 03/07/2023 ते दिनांक 14/072023. पर्यत (कार्यालयीन वेळेत सकाळी 10.30 ते सायकाळी 05.30 वाजे पर्यत )

सदर पदांची संख्या विज्ञापित पदाकरिता आवश्यक अर्हता व अटी ,शर्ती शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग,क्रमांक :एबावि -२०२२ /प्र.क्र.९४ /का.६ दिनांक : ०२,फेब्रुवारी,२०२३ प्रमाणे राहील.

**पदाचे नाव – अंगणवाडी मदतनीस ( 17 पदे ) मानधन रु.5500/-**

शैक्षणिक पात्रता –किमान 12 वी पास

| अ.क्र. | शहराचे नाव | पदाची संख्या | भाषा |
|---|---|---|---|
| 1 | वाशिम | 01 | उर्दू |
| 2 | मंगरूळपिर | 04 | उर्दू |
| 3 | मानोरा | 01 | उर्दू |
| 4 | कारंजा | 01 | उर्दू |
| 5 | पातुर | 04 | उर्दू |
| 6 | बार्शीटाकळी | 04 | उर्दू |
| 7 | बाळापुर | 01 | उर्दू |
| 8 | अकोट | 01 | मराठी |
| | एकूण पदे | 17 | |

टिप –

सविस्तर जाहिरात व अटी शर्ती सह रिक्त पदे असलेल्या अंगणवाडी केंद्रावर , नगर पंचायत, नगर परिषद कार्यालय व बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय (नागरी) अकोला –वाशिम देशमुख यांचे घरी,जय अम्वे शापीच्या वाजूला ,सिव्हील लाईन,वाशिम येथे लावण्यात आलेली आहे. सदरची जाहिरात ,संपूर्ण अटी व शर्ती व अर्जाचा नमुना washim.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अकोला-वाशिम

sd/-
( एम.डी.भस्मे )
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(ना.) अकोला- वाशिम.

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अकोला- वाशिम अंतर्गत बीट निहाय अंगणवाडी केंद्रातील मदतनीस पदाकरिता करावयाच्या

## -: अर्जाचा नमुना :-

| उमेदवाराचा अलीकडील काळात काढलेला रंगीत फोटो |
|---|

सूचना – १.अर्ज सादर करताना सूचनांचे व जाहिरातीचे अवलोकन करावे.
२.अर्जात लिहितांना खाडाखोड करू नये .३.अपूर्ण भरलेले अर्ज अपात्र केले जातील.

प्रति,
मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी,
नागरी ,अकोला -वाशिम.
पत्ता :- देशमुख यांचे घरी ,जय अम्बे सुपर शॉपी जवळ ,
सिव्हील लाईन ,वाशिम -444505

नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्राचे नाव ------------------------------------------------

१. अर्जदार महिलांचे लग्नापूर्वीचे संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------
( लग्नानंतर नावात बदल असल्यास ) ------------------------------------------------------------------
मोबाईल क्रमांक :- ----------------------------------------

२. जन्म तारीख / / ( वयोमर्यादा 18 ते 35 वर्ष( विधवा करिता वयोमर्यादा 40 वर्ष )
जाहिरातीच्या दिनांकास ( दि. 15/06/2023 रोजी )वय - वर्ष ---------- महिने ------------- दिवस ---------------

३. निवासी पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

४. मागासवर्गीय असल्यास - (सोबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक )
जात -----------------, जातीचा प्रवर्ग ------------------------

५. अ)आधारकार्ड नं. ------------------------------------( अद्यावत केलेले अर्ज सादर करण्यापूर्वी )
( सोबत प्रत जोडणे आवश्यक )
ब) मतदान कार्ड नं. -------------------------------------- (सोबत प्रत जोडणे आवश्यक )

६. विधवा असल्यास स्वघोषणा प्रमाणपत्र व पतीचे मृत्यू प्रमाणपत्र सोबत जोडावे

७. अनाथ असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

<u>८. भाषेचे ज्ञान</u> :- मराठी भाषेचे ज्ञान आहे काय ? होय/नाही.
मराठी भाषा लिहिता येते काय ? होय /नाही.
मराठी भाषा वाचता येते काय ? होय नाही.
स्थानिक भाषेचे ज्ञान आहे काय? होय /नाही. असल्यास कोणती ?-----------------------

९. शैक्षणिक पात्रता :- (सोबत कागदपत्र जोडावीत .)

| अ.क्र. | इयता | माध्यम | पास झाल्याचे वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | 12 वी. | | | | | |
| २ | पदवीधर | | | | | |
| ३ | पदव्युत्तर | | | | | |
| ४ | डी.एड. | | | | | |
| ५ | बी.एड. | | | | | |
| ६ | MS-CIT | | | | | |

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी -*- अकोला-वाशिम -*-

१०) अनुभव - अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षाचा अनुभव आहे काय ?
होय / नाही.( असल्यास तपशिल व प्रमाणपत्र सोबत जोडावे.)------------------------------------------------------------
११)लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र ( लहान कुटुंब दोन पेक्षा जास्त हयात अपत्य नसलेबाबत दत्तक दिलेल्या अपत्या सह )

**प्रमाणपत्र**

1. प्रमाणित करण्यात येते की,सदर अर्जातील दिलेली माहिती खरी आहे.जर ही माहिती खोटी निघाल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल.व पुढील कार्यवाहीस मी पात्र असेन यांची मला जाणीव आहे.

2.गुणानुक्रमे देण्यात येणाऱ्या कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करण्यास मी तयार आहे.

उमेदवाराचे नाव :- ----------------------------------------------------

दिनांक :-

स्वाक्षरी :- ------------------------------

ठिकाण :-

परिशिष्ट

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतीज्ञापत्र ) नियम,2005 नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना
प्रतिज्ञापत्र

नमुना – ब

( नियम ४ पहा )

मी ,श्रीमती --------------------------------------------------------------------------------------------श्री.
---------------------------------------------------------------------------- यांची /मुलगी/पत्नी ,वय ---------------वर्ष
राहणार ------------------------------------------------------------ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

१. मी ------------------------------------ या पदासांठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला खालील प्रमाणे मुले आहेत.त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------------------- आहे . (असल्यास ,जन्मदिनांक नमूद करावा.)

| अ.क्र. | मुलाचे /मुलीचे नांव | जन्म तारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल ,किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा कमी करण्यास पात्र होईल,यांची मला जाणीव आहे.

दिनांक:-

उमेदवाराचे नाव :- ----------------------------------------------------

ठिकाण :-

स्वाक्षरी :- ------------------------------------------

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अकोला-वाशिम

( शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग 9 मार्च,2015 नुसार )

## -: स्वघोषणा प्रमाणपत्र :-

मी ------------------------------------------- श्री. -------------------------------------------- यांची पत्नी वय -----वर्ष ,आधार क्रमांक ----------------------------- व्यवसाय ---------------------- राहणार ---------------- ------------------------------- याव्दारे घोषित करते की, माझ्या पतीचे निधन दि. / / रोजी झालेले असून मी सद्स्यस्थित पुनर्विवाह केलेला नाही. करिता मी विधवा असल्याचे या स्वघोषणा प्रमाणपत्राव्दारे घोषित करीत आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास,भारतीय दंड संहिता अन्वये आणि /किंवा संबधित कायदानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- ---------------------------------- अर्जदाराची सही ----------------------------------

दिनांक : / / अर्जदाराचे नाव ----------------------------------------

## अटी व शर्ती

१. उमेदवार हा किमान 12 वी पास असणे अनिवार्य आहे.12 वी पास पेक्षा कमी शिक्षण झालेल्या उमेदवार यांनी अर्ज करू नये.

२. सदर पदाकरिता फक्त महिला उमेदवारांनी अर्ज सादर करावे.

३. सदर उमेदवार हा स्थानिक म्हणजेच त्याच नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्रातील रहिवाशी असावा.स्थानिक निवासी राहत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर कार्यालयाच्या निर्देशनास आल्यास सदर उमेदवार यांची सेवा समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. उमेदवाराची वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३५ (विधवा करिता वयोमर्यादा ४० वर्ष ) वर्षे असणे आवश्यक आहे.

५. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. अर्जा सोबत सर्व कागदपत्राच्या स्व:साक्षांकित प्रति व लहान कुटुबांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

७. विहित नमुन्यातील अर्ज बाल विकास प्रकल्प अधिकारी ( नागरी ) कार्यालय ,अकोला- वाशिम येथे सादर करावा.

८. विहित मुद्तीनतंर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.(दि.१४.०७.२०२३ रोजी साय.५.३० नंतर )

९. उमेदवाराने निवड प्रक्रीये करिता राजकीय दबाव किंवा प्रत्यक्ष गैर मार्गाने दबाव आणल्यास उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद करून त्याच्यावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल ..

१०. अर्जामध्ये नमूद केलेल्या सविस्तर अटी व शर्ती नुसारच अर्ज सादर करावा.

११. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे निकष व महिला व बाल विकास विभाग,महाराष्ट्र शासन तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,मुंबई यांनी विहित केलेले कर्तव्य व जबावदारी , नियम यांचे पालन उमेदवारास करणे बंधनकारक राहील.

१२ नेमणूकी संदर्भात निवड समितीचा निर्णय अतिंम राहील .

१३. अर्जाचा नमुना कार्यालयात.उपलब्ध आहे, तसेच संबधित अंगणवाडी केंद्रावर उपलब्ध आहे.

१४. लहान कुंटूबाचा अर्थ उमेदवाराला जास्तीत जास्त दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह ) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही.नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. सेवा कालावधीत तिसरे अपत्य झाल्यास सेवा समाप्त करण्यात येईल.

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी * अकोला-वाशिम *

स्वा
( एम.डी.भस्मे )
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(ना.) अकोला- वाशिम.

# बाल विकास प्रकल्प अधिकारी ( नागरी प्रकल्प ) वाशिम

<u>उमेदवारासाठी सर्वसाधारण सूचना :-</u>

१. जाहिरात व सोबतच्या सुचनाचे अवलोकन करावे.

२. अर्ज संपूर्ण भरलेला असावा तसेच अर्जात खाडाखोड करू नये ,खाडाखोड असलेला अर्ज ,परिपूर्ण कागदपत्र व स्व:साक्षांकित नसलेले कागदपत्र विचारात घेतले जाणार नाहित .तसेच अर्ज केल्यानंतर कोणत्याही प्रकारचे इतर कागदपत्र नंतर सादर करता येणार नाहीत, तसेच स्वीकारले जाणार नाहीत.

३. अर्जासोबत उमेदवाराचा अलीकडील काळातील रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो जोडणे आवश्यक राहील.

४.अर्जामध्ये संपूर्ण नाव ,पत्ता पिनकोड सह शैक्षणिक अर्हता नमूद करावी.

५.ओळखपत्र म्हणून आधार कार्डची प्रत / राशन कार्ड /मतदान कार्ड इ.

६ .अर्जासोबत लहान कुटुंब असलेबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.लहान कुटुंब असले बावतचे प्रमाणपत्र विहित नमुन्यातील असणे आवश्यक आहे .(लहान कुटुंब याचा अर्थ ,दोन जिंवत मुले,यासह पत्नी व पती (आई.वडील,सासू,सासरे इ.यासह )असा आहे. केवळ दोन अपत्य असलेला उमेदवार पात्र राहील . दोनपेक्षा जास्त अपत्य असल्यास अपात्र समजण्यात येईल.याची सर्वांनी नोंद घ्यावी.

७. अर्जदारांनी जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे दि. ०३/०७/२०२३ ते दि. १४/०७/२०२३ पर्यत अर्ज स्व:हस्ते किंवा पोष्टाव्दारे बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी )कार्यालय अकोला- वाशिम , देशमुख यांचे घरी ,जय अम्बे शॉपीच्या बाजूला ,सिव्हील लाईन ,वाशिम ४४४५०५ .येथे सादर करावे.शासकीय सुट्टीच्या दिवशी कार्यालय बंद राहील.अर्ज स्वीकारण्याची वेळ सकाळी १०.३० ते साय.५.३० पर्यत असेल.

८. अर्जासोबत जोडलेली कागदपत्र पडताळणी/ छाननीच्या च्या वेळी मूळ कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे .अन्यथा उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.चुकीचे किंवा खोटे प्रमाणपत्र सादर केल्याचे कोणत्याही टप्प्यावर निर्देशनास आल्यास निवड रद्द करण्यात येईल. कामावर रुजू करून घेतले तरी देखील कामावरून कमी करण्यात येईल.

९. अर्जदार हा स्थानिक रहिवासी (आधार कार्ड ,राशन कार्ड ,विद्युत देयक ) असणे अनिवार्य आहे.अंगणवाडी स्थित ( नगर परिपद /नगर पंचायत )मधील रहिवासी महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.संबधित नगर परिपद /नगर पंचायत बाहेर
राहणा-या उमेदवाराच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

१०. अंगणवाडी मदतनीस यांची सदर पदे हि एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंगणवाडी सेवेतील असून ती पूर्णतः मानधनी स्वरूपाची आहेत .

११. शैक्षणिक पात्रता – किमान १२वी पास किंवा अधिक .

१२. मदतनीस पदासाठी वयोमर्यादा १८ ते ३५ वर्ष (विधवा करिता वयोमर्यादा ४० वर्ष ) राहील.(जाहिरातीच्या दिनांकास).
वयाचा पुरावा.- अ) शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला ,ब) माध्यमिक शालांत परीक्षा १० वीचे प्रमाणपत्र , क) सक्षम प्राधिक-याने दिलेला जन्माचा दाखला ,ड) नगरपालिका /महानगरपालिका / ग्रामपंचायतिचा जन्म दाखला

| | |
|---|---|
| विधवा उमेदवार | स्व :घोषणा प्रमाणपत्र व पतीचे मृत्यू प्रमाणपत्र सोवत जोडावे |
| अनाथ असल्यास | सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र |

१३. मागासवर्गीय उमेदवार असल्यास (अनु.जाती/अनु.जमाती ) १० अतिरिक्त गुण देण्यात येतील तसेच विमुक्त जाती/भटक्या जमाती /विशेष मागास प्रवर्ग/इतर मागासवर्गीय उमेदवारांना ५ अतिरिक्त गुण देण्यात येतील.यासाठी सक्षम प्रधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्राची प्रत अनिवार्य आहे.पावतीवरून गुण देण्यात येणार नाहीत.

१५. अंगणवाडी सेविका व मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असणा-यांना ५ अतिरिक्त गुण देण्यात येतील .सोबत आदेश व अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

१६. भाषेचे ज्ञान – ज्या अंगणवाडी केंद्राकरिता मदतनीसची नियुक्ती करावयाची आहे अशा अंगणवाडी मध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषे व्यतिरिक्त इतर भाषा बोलणारी असतील तर अशा अंगणवाडी मध्ये सदर भाषेचे ज्ञान असलेल्या उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. त्यांना मराठी भापेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.इ.10 वी अथवा नमूद शैक्षणिक अर्हतापैकी किमान एक अर्हता मराठी भापा विपयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

१७. प्राथमिक यादीतील उमेदवाराचे प्रमाणपत्र व त्याबाबत दिलेले गुण याबावत तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी यादी घोपित केल्याच्या दिनांकापासून 10 दिवसाच्या आत संवधित वाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे कडे तक्रार दाखल करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारची दखल घेतली जाणार नाही यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८. मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून गुणवत्ता यादी पडताळणी समितीच्या मान्यते नंतर गुणवत्ता यादी बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना.) कार्यालय, अकोला – वाशिम,अंगणवाडी केंद्र व नगर परिपद/नगर पंचायत येथील नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

१९. जाहिरात दिल्यांनतर एकही पात्र उमेदवाराकडून अर्ज प्राप्त झाला नाही किंवा एकच पात्र उमेदवाराकडून अर्ज प्राप्त झाला तर फेर जाहिरात देण्यात येईल.जर फेर जाहिरात देऊन सुध्दा फक्त एकच पात्र उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाला तर त्या उमेदवाराची छाननीच्या अधीन राहून निवड करण्यात येईल.

२०. प्रतिक्षा यादी.- एकूण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर (Merit List) उमेदवाराची प्रतिक्षायादी लावण्यात येईल.जर काही कारणामुळे उमेदवार आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ते पुढील १० दिवसापर्यत रुजू होऊ शकला नाही,किंवा ती अपात्र ठरविण्यात आली तर प्रतीक्षा यादीतील गुनानुक्रमानुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल व सदर क्षेत्रात मदतनीसने राजीनामा दिल्यास अथवा काही कारणास्तव पद रिक्त झाले अथवा नवीन अंगणवाडी मंजूर झाली तरीही प्रतीक्षा यादीतील उमेदवारास गुनानुक्रमानुसार थेट नियुक्ती देण्यात येईल.सदर प्रतीक्षायादी निकाल जाहीर झाल्यापासून १ वर्षापर्यत वैद्य राहील.

२१. नियुक्ती झाल्यानतरची कार्यवाही.- बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाने दिलेल्या नियुक्ती आदेशानुसार तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना निकष तसेच महिला व बाल विकास विभाग,महाराष्ट्र शासन ,एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय तसेच विभागीय उपआयुक्त ,महिला व वाल विकास विभाग यांनी विहित केलेले कर्तव्य व जबाबद-यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२२.सदर भरती प्रक्रीये वाबत शासनाकडून पारित होणारे शासन निर्णय ,आदेश,सूचना ह्या उमेदवारास लागू राहतील तसेच निवड समितीचा निर्णय अंतिम राहील .

२३.निवड प्रक्रीये संदर्भात कोणतीही शंका असल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय ,वाशिम येथे संपर्क साधावा.

२४. अर्जासोबत मूळ कागदपत्र जोडण्यात येवू नये.

२५..उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्र/किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती/अर्ज रद्द करण्यात येईल.

२६.विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारण्यात येतील ,इतर प्रकारचे अर्ज नाकारण्यात येतील.

२७.विहित मुदती नंतर आलेले अर्ज स्वीकारल्या जाणार नाहीत.(पोष्टाच्या दिरगाई किंवा अन्य बाबीमुळे विलंब झालेले अर्ज.)

२८.कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी नियुक्ती अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र न घेता केलेले अर्ज रद्द केल्या जातील.

२९.उमेदवार अनु.जाती/अनु.जमाती/भ.वि.जाती/इ.मा.व/वि.मा.प्र.प्रवर्गातील असल्यास तहसीलदार किंवा

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी
अकोला-वाशिम

उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जातीच्या प्रमाणपत्राची सांक्षाकीत प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील तसेच नियुक्ती झाल्यांनतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

३०.निवड प्रक्रिया रद्द करणे किंवा स्थगित करण्याचे सर्व अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प वाशिम यांनी राखून ठेवले आहेत.

३१. निवड झालेल्या उमेदवाराची त्यांनी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्र संबधित विभागाकडून / कार्यालयाकडून पडताळणी केल्यानंतरच अंतिम आदेश देण्यात येतील.

३२. सदरची जाहिरात ,संपूर्ण अटी व शर्ती व अर्जाचा नमुना washim.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वा/-
( एम.डी.भस्मे )
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(ना.) अकोला- वाशिम.

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी
अकोला-वाशिम